**<u>सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९–०००३४०–२०२४</u>**

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८२/२०२४</u>**

**<u>निशाणी क्र.१७ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.१ यांना दाव्याचे समन्स पाठविले असता 'नाव चुकीचे असलेने दावा समन्स न बजावता मागे' असा बेलीफ रिपोर्ट आहे. वास्तविक प्रतिवादी क्र.१ यांचे नाव जयवंत नसून जयंत असे आहे. तरी दाव्यात दुरुस्ती करुन त्यांना त्याप्रमाणे दाव्याचे समन्स पाठविणेत यावे अशी विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. परंतु, प्रतिवादी यांना योग्य ती संधी देऊन देखील प्रतिवादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल न केल्याने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांच्या म्हणण्या विना चालविण्यात येत आहे.

०४. अर्जाचे अवलोकन केले. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा वादी यांनी जाहीर ठराव करुन मिळावा याकरिता दाखल केला आहे.

०५. वादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. सदर कामी <u>नि.क्र.६</u> वरील बेलीफ रिपोर्ट याचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणी वादी यांनी मागितलेली दुरुस्ती ही प्रतिवादी क्र.१ यांच्यावर दावा समन्सची बजावणी करणे करिता आवश्यक असल्याचे दिसून येते. तसेच, दावा मिळकती मधील वादीच्या व प्रतिवादींच्या हक्काबाबत निराकारण करणे सोईचे होणारे आहे. सदर अर्जामध्ये

तथ्य असून सदरची दुरुस्ती ही न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे निराकरण होण्यासाठी वादी यांनी अर्जात दिल्या प्रमाणे दुरुस्ती करणेस हरकत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

– **आदेश** –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी. सदर आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.07.01 13:27:34 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दिनांकः०१/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड